# फौजदारी प्रक्रियेतील बदल

प्रवीण दीक्षित
निवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र

# महत्त्वाचे बदल

- IPC 1860 ऐवजी भारतीय न्याय संहिता,
- Cr P C 1898 व 1973 ऐवजी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता व
- Indian Evidence Act 1872 ऐवजी भारतीय साक्ष्य संहिता

संसदेने 2023 मध्ये मान्य केले आहेत व राष्ट्रपतींच्या स्वाक्षरी नंतर ते लगेचच संपूर्ण देशात लागू होणार आहेत.

सामान्य नागरिकाला शिक्षा करण्यासाठी नव्हे तर न्याय देण्याच्या उद्देशाने भारतीय परंपरेवर आधारीत भारतीयांनी ,भारतीयांसाठी नवीन कायदे बनवलेले आहेत. गेली 4 वर्षे सर्वांशी विचार विनिमय करून अनेक त्रुटी दूर करून हे कायदे बनवण्यात आले आहेत.

# भारतीय न्याय संहिता

- 358 एकूण  कलमे असतील, पूर्वी 511 होती.
- 175 कलमांमधे बदल केले आहेत,
- 20 नवीन गुन्हे असतील.
- 9 कलमे वाढवण्यात आली आहेत
- 23 गुन्ह्यात कमीतकमी शिक्षा असेल.
- 22 कलमे रद्द करण्यात आली आहेत.
- 6 गुन्ह्यात समाजसेवेची शिक्षा सुचवली आहे.

# भारतीय नागरीक संरक्षण संहिता

- 531 एकूण कलमे आहेत, पूर्वी 484 होती.
- 177 कलमांमधे बदल करण्यात आला आहे.
- 9 कलमे नवीन घालण्यात आली आहेत.
- 14 कलमे रद्द करण्यात आली आहेत.

# भारतीय साक्ष्य संहिता

- 170 एकूण कलमे आहेत, पूर्वी 167 होती.
- 24  कलमांमधे बदल करण्यात आले  आहेत.
- 2 कलमे वाढवण्यातआली  आहेत.
- 6 कलमे रद्द करण्यात आली आहेत.

# वैशिष्ट्ये

- गुलामगिरीचे द्योतक असलेले फोजदारी प्रक्रियेचे  इंग्रज काळातील तीनही कायदे रद्द
- वसाहतवादातील कायदे रद्द व लोकांची सेवा व कल्याण लक्षात घेऊन नवीन कायदे
- ह्या तीनही कायद्यांमुळे न्याय प्रक्रिया, पोलीस कार्यवाही व तपासाची पद्धत ह्यामधे अत्याधुनिक तंत्रज्ञान व न्यायसंहिता  ( forensic Science) पद्धत सुरू. त्यामुळे गरीब, वंचित व पीडित समाजाच्या मानवाधिकारांचे संरक्षण केले जाणार व दोषसिद्धी वाढणार दहशतवाद, संघटित गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई.
- देशद्रोह हे कलम रद्द

# वैशिष्ट्ये

- प्रथम खबर घेण्यापासून ते साक्ष्य , न्याय निवाडा पर्यंत सर्व गोष्टीं आता online होणार आहेत. Zero F.I.R.. म्हणजेच जवळच्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करता येईल व जरुरी प्रमाणे योग्य पोलीस ठाण्यात तपासासाठी तो पाठवला जाईल. त्याची प्रत तक्रारदारास दिली जाईल.
- तक्रार केल्यावर 3 दिवसात गुन्हा दाखल करावा लागेल, व 3-7 वर्षे शिक्षेच्या गुन्ह्यात प्राथमिक चौकशी नंतर गुन्हा दाखल केला जाईल.
- आता केवळ आरोपीचाच विचार केलेला नसून जो पीडित व बळी आहे त्याच्याही अधिकारांचे संरक्षण होणार आहे. न्यायालयात पीडित व्यक्ती तर्फेही अभियोक्ता बाजू मांडू शकेल. सर्व बाजूंमधे समतोल साधला जाणार आहे.
- महिला व मुले ह्यांच्या विरोधी गुनह्यांना प्राधान्य देऊन सर्व प्रथम हे गुन्हे नमूद करण्यात आले आहेत व मातृशक्तीचा सन्मान करण्यात आला आहे.

# वैशिष्ट्ये

- नवीन कायद्यांप्रमाणे 3 वर्षात खटला निकाली निघण्यासाठी 90 दिवसात पोलीस तपास पूर्ण करणे बंधनकारक राहील. वकील व न्यायालयांवरही अशीच काल मर्यादा घालण्यात आली आहे. सर्व घटकांचे networking करण्यात येत आहे.
- 7 वर्षांहून अधिक शिक्षा असणाऱ्या गुह्न्यात forensic science ची मदत घेणे सक्तीचे करण्यात आले आहे.
- राजद्रोहा ऐवजी आता सशस्त्र विद्रोह, विध्वंसक कारवाया व देशाच्या अर्थव्यवस्थेला तडा देणाऱ्याविरुद्ध कारवाई होईल. भारताचे सार्वभौमत्व, एकात्मता, सुरक्षा, आर्थिक सुरक्षा व अखंडते विरुद्ध वागणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल.तसेच भारताबाहेरील कोणत्याही देशाला आतंकित करणे दहशतवादी कृत्य असेल.
- संघटीत गुह्न्यांची व्याख्या करुन त्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली आहे.
- छोटे गुह्ने करणाऱ्यांसाठी कारावासा ऐवजी समाजसेवा ही नवीन संकल्पना सुरू करण्यात आली आहे.

# वैशिष्ट्ये

- प्रत्येक पोलीस ठाण्यात e register असेल व त्यात कोणाला ठाण्यात आणले आहे ह्याचा उल्लेख असेल.अटक केलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना कळवले जाईल.त्यामुळे पोलीस कामात पारदर्शकता येणार आहे.
- 3 वर्षांपेक्षा कमी शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यात 60 वर्षांवरील व्यक्ती व महिला ह्यांना अटक करण्याचे नियम सुस्पष्ट केले आहेत.
- पीडित व्यक्तीला प्रथम खबरी अहवाल, साक्षीदारांचे जबाब 90 दिवसात दिले जाणार आहेत. तसेच खटल्याची प्रगती कळवली जाईल. पीडितास नुकसान भरपाई मागता येईल त्यामुळे त्याचा आत्मसन्मान कायम राहण्यास मदत होणार आहे.
- सोन साखळी हिसकावणे, मोबाइल पळवणे गुन्हे ठरणार आहेत.
- खोट्या नावाने, लग्नाचे खोटे आमिष दाखवून शरीर संबंध ठेवणाऱ्यांना कठोर शिक्षा सुचवली आहे.

# वैशिष्ट्ये

- घराचा शोध घेताना तसेच मालमत्ता जप्त करताना, पुरावे गोळा करताना पंचाच्या समक्ष video recording सक्तीचे करण्यात आले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीस नाहक त्रास देणे कमी होणार आहे.
- 18 वर्षाखालील महिले वरिल बलात्काराच्या गुन्ह्यात मृत्युदंड व जन्मठेपेची शिक्षा असेल.एकाहून अधिक व्यक्तींनी बलात्कार केल्यास मृत्यु पर्यंत 20 वर्षे जन्मठेप असेल.
- ज्या घटनेत स्फोटकांमुळे मृत्यु झाला आहे,विषारी वायू वापरला आहे, किंवा अणु प्रयोग आहे,विक्री आहे, अशा घटनाना दहशतवादी घटना समजल्या जातील.
- अपघातात जेह्वा चालक पीडित व्यक्तीला रुग्णालयात नेतो, त्यावेळेस कमी शिक्षा असेल, पण चालक पळून गेल्यास 10 वर्षे कारावासात रहावे लागेल.

# वैशिष्ट्ये

- बऱ्याचशा दहशतवादी गुन्ह्यात आरोपी पळून गेला असला तरीही, त्याच्या शिवाय न्यायाधीशांना शिक्षा जाहीर करावी लागेल, व त्याची संपत्ती जप्त करता येईल.
- आरोपीला पश्चाताप व्यक्त करून स्वतः 30 दिवसात राष्ट्रपतींना दयेची याचना करावी लागेल तरच त्याचा विचार केला जाईल.
- सर्व फौजदारी प्रक्रियेचे तातडीने digitisation करण्यात येत आहे. त्यामुळे भारतातील ही व्यवस्था संपूर्ण जगात अत्याधुनिक होईल.
- सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध 120 दिवसात खटला चालवण्यास मंजूरी द्यावी लागेल.
- Electronic evidence मान्य करण्यात आला आहे.

# ऐतिहासिक बदल

- ह्या बदलांमुळे सर्व नागरिकांना कमीतकमी वेळात भारतीय परंपरे प्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून  न्याय मिळणे शक्य होणार आहे.
- त्यासाठी सर्व यंत्रणांनी ह्या कायद्यांचा अभ्यास करावा, प्रशिक्षण आयोजित करावे ही येणाऱ्या काळाची गरज आहे.